


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३४२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२३ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## जरांगे पाटील थेट जंतर मंतरवर पोहोचले, अभिजीत दिपकेंना दिला एकच सल्ला !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, नवी दिल्ली :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज नवी दिल्ली इथं जात अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वात जंतर मंतरवर सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी जरांगे पाटील यांनी अभिजीत दिपके यांचं कौतुक करत त्यांना आंदोलनासाठी कानमंत्र दिला आहे. तुम्ही ही जागा सोडू नका, अन्यथा सरकार तुमचं आंदोलन चिरडून टाकेल, असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. तसंच यापुढे सरकारने विद्यार्थ्यांवर हल्ला केल्यास आम्ही सर्वजण तुमच्यासोबत लढू, असा विश्वासही जरांगे यांनी दिला आहे.

जंतर मंतर इथं सुरू असलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाच्या व्यासपीठावर आंदोलनकर्त्यांना संबोधित करताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आम्ही अंतरवाली सराटी इथं गोरगरिबांच्या लेकरांसाठी आंदोलन केलं. तेव्हाही यांच्या सरकारने लहान मुलं, महिलांवर लाठीचार्ज केला. या सरकारने आमच्यावरही गोळ्या घातल्या होत्या. माझी सगळ्या विद्यार्थ्यांना विनंती आहे की, तुम्ही ही जागा सोडू नका. पूर्ण देश तुमच्या सोबत आहे. तुम्ही इकडं-तिकडं गेला तर हे लोक आंदोलन मोडून टाकतील. शांततेच्या आंदोलनात प्रचंड ताकद आहे आणि आम्ही ते सिद्ध करून दाखवलं आहे.



आम्हीही तुमच्या सोबत आहोत, असा शब्द जरांगे पाटलांनी दिला.

**भाजपवर जोरदार हल्लाबोल !**

अभिजीत दिपके यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत असताना मनोज जरांगे पाटील यांनी भाजप सरकारवर जोरदार टीका केली आहे. देशातील भाजप सरकार वारंवार गोरगरिबांच्या लेकरांवर अन्याय करत आहे. यापुढील काळात जर पुन्हा सरकारने अशा प्रकारचा हल्ला विद्यार्थ्यांवर करण्याचा प्रयत्न केला तर या नेत्यांचं महाराष्ट्रात फिरणं पूर्ण बंद होणार. यांचा माज उतरवल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा इशारा पाटील यांनी दिला आहे.

सरकारला आपण निवडून दिलं आहे. आपल्या मायबापाने यांना मतदान केलंय, आपल्या जिल्ह्यातील, तालुक्यात आणि गावातील लोकांनी यांना मतदान केलं आहे. परंतु हेच लोक आपल्यावर आता उलटले आहेत. यांना उलटं करण्याची ताकद या देशातील विद्यार्थ्यांमध्ये आहेत, लोकांमध्ये आहे. पण ही गोष्ट यांच्या लक्षात येत नाही. यापुढील काळात तुम्हाला धक्का लागला तर आम्ही तुमच्या सगळ्यांसोबत आहोत, अभिजीत भैय्यांसोबत आहोत, एवढाच शब्द मी तुम्हाला देतो, असंही मनोज जरांगे म्हणाले.

दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी सुरुवातीला मनोज जरांगे पाटील यांना हिंदीतून बोलण्याची विनंती केली होती. मात्र माझी हिंदी ऐकल्यावर तुम्हाला जी हिंदी येते, तीही तुम्ही विसरून जाल, अशी मिश्किल टिपण्णी त्यांनी केली. त्यानंतर अभिजीत दिपके यांनी जरांगे पाटील यांनी मराठीत केलेल्या भाषणाचा सार हिंदीतून सांगत जरांगे पाटील आपल्यासोबत असल्याचा विश्वास आंदोलकर्त्या तरुणांना दिला.

## मांडवे खुर्द ग्रामस्थांचे आमरण उपोषण तात्पुरते स्थगित !

### कायमस्वरूपी शिक्षकांची हमी,गट शिक्षणाधिकारी यांची मध्यस्थी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील मांडवे खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पदवीधर शिक्षक आणि कायमस्वरूपी मुख्याध्यापक ही दोन्ही पदे रिक्त असल्याने शाळेमधील इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत २०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी आज सुरू असलेले आमरण उपोषण अखेर गटशिक्षण अधिकारी तेजस्विनी पवार यांच्या मध्यस्तीने सायंकाळी ५:३० वा.तात्पुरते स्थगित करण्यात आले.

शाळेला कायमस्वरूपी पदवीधर शिक्षक आणि मुख्याध्यापक मिळावेत या मागणीसाठी पालक आणि ग्रामस्थ आक्रमक झाले होते. सध्या कायम शिक्षक नसल्याने अध्यापनावर आणि नेतृत्व नसल्याने प्रशासकीय कामांवर परिणाम होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली होती. उपोषणाची माहिती


दैनिक अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
मुख्य संपादक : विनोद गोरे मोबा.८६०५३९३२०२
कायमस्वरूपी शिक्षकांच्या मागणीसाठी मांडवे खुर्द ग्रामस्थांचे आजपासून आमरण उपोषण
मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा बहुमान प्राप्त शाळेला शिक्षकच नाहीत
Main Edition - 22 Jul 2026 - Page 3
Powered By Aksharaj Media

मिळताच गटशिक्षण अधिकारी तेजस्विनी पवार व शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले गुरुजी यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून मागण्यांबाबत सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिले. तसेच नेमणुकीच्या प्रक्रियेसंदर्भात वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान, मांडवे खुर्दची ही शाळा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या



राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित आहे. स्वच्छता, पटसंख्या आणि निकालात अव्वल असलेल्या या शाळेसाठीच मूलभूत सुविधांसाठी रस्त्यावर उतरावे लागले, यावर ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. उपोषणकर्ते शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव, कैलास दादा गागरे, युवा नेते दिपक बत्तीसे, मंगेश गागरे, तसेच सरपंच कमलताई गागरे जगन्नाथ जाधव मेजर, गौतम शेठ बागुल, नामदेव गागरे, रेवन्नाथ गागरे, अण्णासाहेब क्षिरसागर, सोपान आहेर, शिवचरण जाधव, विलास शेठ गागरे, नवनाथ गागरे, योगेश आहेर, भागवत बिडकर, अजय बागुल, अनिल गागरे, मंगल बिडकर, नर्मदा भोर आदी उपस्थित होते.

तसेच टाकळी ढोकेश्वरचे माजी सरपंच शिवाजी खिल्लारी, युवा नेते अम ोल उगले, सरपंच अभिजीत झावरे यांनी उपोषण स्थळी भेट दिली. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्यास आंदोलन पुन्हा तीव्र करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## आषाढी वारीसाठी मध्य रेल्वेच्या दोन विशेष गाड्या

### सीएसएमटी–मिरज वन-वे सेवा

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२२, मुंबई :** आषाढी वारीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते मिरज दरम्यान आणखी दोन वन-वे आषाढी विशेष रेल्वेगाड्या चालविण्याची बुधवारी घोषणा केली. त्यामुळे पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांना दिलासा मिळाला आहे.

गाडी क्र. ०११८३ ही वन-वे विशेष गाडी २५ जुलै रोजी दुपारी ३.२० वाजता सीएसएमटी येथून सुटून २६ जुलै रोजी पहाटे ३.३० वाजता मिरज येथे पोहोचेल. गाडी क्र. ०११८१ ही वन-वे विशेष गाडी २६ जुलै रोजी पहाटे १२.२५ वाजता सीएसएमटी येथून सुटून त्याच दिवशी सकाळी ११.२५ वाजता मिरज येथे पोहोचेल. या दोन्ही विशेष गाड्यांना दादर, ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड, कुर्डुवाडी आणि पंढरपूर येथे थांबा असेल. दोन्ही गाड्यांची रचना १ वातानुकूलित द्वितीय श्रेणी (एसी २-टियर), ३ वातानुकूलित तृतीय श्रेणी (एसी ३-टियर), ८ शयनयान (स्लीपर), ४ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ सामान्य द्वितीय श्रेणी आसन व्यवस्था सह गार्ड ब्रेक व्हॅन अशी असेल. या विशेष गाड्यांसाठीचे आरक्षण २३ जुलै पासून सुरू होणार आहे.

## सावलीच्या विकासासाठी कटिबध्द,

### विकासकामांना गती देण्यासाठी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२२, सावली (चंद्रपूर) :** कॉँग्रेस विधिमंडळ गटनेते, महाराष्ट्र राज्य लोकलेखा समितीचे अध्यक्ष तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आ. विजय वडेट्टीवार यांच्या प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शनाखाली सावली येथील रुबाबदार लॉन येथे पंचायत समिती सावलीची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. या सभेत पंचायत समितीअंतर्गत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

सभेदरम्यान शिक्षण, आरोग्य, ग्रामीण पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम, कृषी, पशुसंवर्धन, महिला व बालविकास, समाजकल्याण, ग्रामविकास तसेच इतर विभागांच्या कामकाजाचे सादरीकरण करण्यात आले. पूर्ण झालेली विकासकामे, प्रगतीपथावरील प्रकल्प, प्रलंबित कामे तसेच नागरिकांकडून प्राप्त झालेल्या विविध समस्या व तक्रारींची सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी आ. विजयभाऊ वडेट्टीवार यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना विकासकामांमध्ये कोणत्याही प्रकारचा अनावश्यक विलंब होऊ नये, अशी स्पष्ट सूचना दिली. शासनाने मंजूर केलेली कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने व निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यात यावीत, नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी तसेच सर्वसामान्यांना शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळेल, यासाठी जबाबदारीने काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तालुक्यातील पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण, आरोग्य सेवा, स्वच्छता, सिंचन, ग्रामीण पायाभूत सुविधा आणि विविध विकासकामांमध्ये अधिक समन्वयाने काम करण्याची गरज व्यक्त करत त्यांनी प्रत्येक विभागाने लोकाभिमुख भूमिका घेण्याचे आवाहन केले. विकासकामांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राखून जनतेच्या अपेक्षांनुसार कार्य करण्यावरही त्यांनी भर दिला. मार्गदर्शन करताना आ. वडेट्टीवार म्हणाले की, सावली तालुक्यातील प्रत्येक नागरिकापर्यंत विकास पोहोचणे हीच आपली प्राथमिकता आहे. मूलभूत सुविधा, दर्जेदार पायाभूत विकास आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. जनतेच्या समस्या तातडीने सोडविणे आणि विकासकामांना गती देणे ही प्रत्येक अधिकाऱ्याची जबाबदारी आहे. तसेच, सावली तालुक्याचा सर्वांगीण व शाश्वत विकास करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबरोबरच विकासकामांच्या अंमलबजावणीवर सातत्याने लक्ष ठेवले जाईल. जनतेने दाखविलेला विश्वास कायम राखत विकासाचा वेग अधिक वाढविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या वार्षिक सर्वसाधारण सभेमुळे विविध विभागांतील कामांचा आढावा घेऊन प्रलंबित प्रश्नांच्या निराकरणासाठी दिशा निश्चित करण्यात आली असून, तालुक्याच्या विकासाला अधिक गती मिळण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## राज्यात सर्वत्र पाऊस पडू दे, शेतकरी सुखी राहू दे' ; फडणवीसांचे विठ्ठल चरणी साकडे

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२२, पंढरपूर :** आषाढी वारीच्या पवित्र वातावरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दसूर पाटी येथे जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पादुकांचे भक्तिभावाने दर्शन घेत राज्याच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. राज्यात सर्वत्र चांगला पाऊस पडू दे, शेतकरी सुखी आणि समाधानी राहू दे, असे साकडे त्यांनी माऊलीच्या चरणी घातले. यावेळी त्यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी रथाचे काही काळ सारथ्य करून वारीचा आध्यात्मिक आनंदही अनुभवला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारीत चालणारा प्रत्येक वारकरी हा माऊलीचे जिवंत स्वरूप आहे. या दैवी सोहळ्यात सहभागी होण्याचे भाग्य लाभणे ही आयुष्यातील मोठी गोष्ट आहे. राज्यातील शेतकरी सुखी राहावा, भरपूर पाऊस पडावा आणि सर्वसामान्य जनतेच्या जीवनात समृद्धी यावी, हीच आपली माऊलीकडे प्रार्थना असल्याचे त्यांनी सांगितले.

**वारीच्या नियोजनाचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक !**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली मागील दोन वर्षांत आषाढी वारीच्या व्यवस्थापनात झालेल्या सकारात्मक बदलांचे विशेष कौतुक केले. वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी शासनाने सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या असून, त्यामुळे यंदाच्या वारीत विक्रमी संख्येने भाविक सहभागी होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

**एआय तंत्रज्ञानासह आधुनिक व्यवस्थापन !**

जिल्हा प्रशासनाने यंदाच्या वारीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भाविकांची संख्या मोजण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे. तसेच स्वच्छता, पिण्याचे पाणी, शौचालये, जर्मन हँगर, चरण सेवा, आरोग्य पथके, सफाई कर्मचारी आणि इतर आवश्यक सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, तसेच सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी वारकऱ्यांच्या सेवेसाठी उत्कृष्ट नियोजन केले असून त्यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद



केले.

**'दर्शनाचा योग हे माझे भाग्य' !**

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पादुकांचे दर्शन घेण्याचा योग लाभणे हे म ाझे मोठे भाग्य असल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

यापूर्वी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी मुख्यमंत्र्यांना आषाढी वारी २०२६ च्या नियोजनाची आणि विविध सुविधांची सविस्तर माहिती दिली. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार अभिजीत पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.





## दिरंगाई नव्हे अन्यायच!

जूनच्या पहिल्या आठवड्यात केरळ राज्यातील एक आश्चर्य कारक बातमी वाचण्यात आली. सध्या वयाची साठ वर्षे पूर्ण केलेल्या आणि मातृभूमी इंग्लिश शाळेतील माजी शिक्षक अब्दुल माजीद यांनी पार्टटाईम ज्युनियर अरेबिक टीचर या पदासाठी २० वर्षांपूर्वी म्हणजे जवळपास २००५ मध्ये अर्ज सादर केला होता. मात्र, सध्या निवृत्त झालेल्या माजीद यांना आत्ता याबाबतचे नियुक्ती पत्र मिळाल्याने त्यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. त्यासोबत त्यांना याबाबत खंत सुद्धा वाटू लागली आहे. माजीद यांनी या पदासाठी पीएससी परीक्षा दिली होती. त्यात ते प्रतिक्षा यादीत होते. आता प्रश्न पडतो की, जर माजीद संबंधित पदासाठी योग्य होते तर तब्बल वीस वर्षे त्यांना प्रतिक्षा का करावी लागली? आणि जर ते योग्य नव्हते तर इतक्या वर्षांनी त्यांना नियुक्ती पत्र पाठविणाऱ्यांना त्यांच्या वयाचा विसर कसा का पडला ? एकंदर म्हणायचे झाल्यास साक्षरतेमध्ये अग्रेसर असलेल्या केरळ राज्यातील शैक्षणिक विभाग मात्र कुंभकर्णी झोपेत कामं करतात की काय? असा प्रश्न जर मनात उत्पन्न होत असेल तर तो चुकीचा ठरत नाही. एकवेळ कोर्टाच्या बाबतीत तारीख पे तारीख समजू शकतो आणि त्यामुळे निरपराध्यास न्याय मिळण्यासाठी दिरंगाई होते हे सर्वज्ञात आहे. मात्र, जेव्हा एखादा शिक्षण विभाग जर अशा प्रकारची घोडचूक करत असेल तर देशातील विद्यार्थ्यांचे भविष्याचे काही खरे नाही, असेच समजावे लागेल. विशेष म्हणजे परीक्षा दिली त्यावेळी माजीद ३९ वर्षांचे होते आणि नियुक्तीपत्र हाती पडले तेव्हा त्यांनी आयुष्याची ६० वर्षे पूर्ण केली आहेत. केरळ मधीलच दुसरे एक प्रकरण मन हेलावून टाकणारे आहे. स्तनाच्या कर्करोगासाठी जीवनरक्षक 'रिबोसिक्लिब' हे औषध परवडणाऱ्या दरात उपलब्ध व्हावे म्हणून एका कर्करुग्ण महिलेने २०२२ मध्ये दाखल केलेल्या याचिकेची २०२३ पासून अंतिम सुनावणीसाठी तब्बल ५७ वेळा नोंद झाली. मात्र, प्रत्यक्ष सुनावणी झाली नसल्याने बराच विलंब झाला आणि दरम्यान त्या कर्करुग्ण महिलेचा मृत्यू देखिल झाला. कर्करोग झपाट्याने पसरतो हे ज्ञात असूनही न्यायालयाने संबंधित याचिकेची दखल लवकरात लवकर घेतली असती तर कदाचित ती महिला अजून काही काळ नक्कीच जगली असती. मात्र, आपल्या देशात प्रत्येक कामात दिरंगाई ठरलेली असल्याने याचा त्रास सर्व सामान्य जनतेला वारंवार होतोय. आता याची कारणे बरीच असू शकतात. न्याय देण्याबाबत दिरंगाई ठरणारे दुसरे एक प्रकरण नुकतेच रिसोड तालुक्यात पुढे आले. वाशिम न्यायालयाचे जिल्हा सत्र न्यायाधीश झपाटे यांनी नुकताच एक ऐतिहासिक निकाल दिला. ज्यामुळे पोलिस दलात एक मोठी खळबळ माजली आहे. रिसोड पोलिस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार महादेव धांडे यांच्यासह नऊ पोलिसांनी हिंगोली जिल्ह्यातील वाढोणा येथील पारधी बेड्यावर धाड टाकून बेग्या पवार या तरुणाला चोरीच्या एका गुन्ह्यात संशयित म्हणून अटक केली होती. गुन्ह्याची कबूली देण्यासाठी कोठडीत त्याला इतके मारण्यात आले की शेवटी त्याने तुरुंगातच श्वास सोडला. यानंतर गुन्हे अन्वेषण विभागाकडून तपास करण्यात आला. याप्रकरणी न्यायालयाने ठाणेदार धांडेसह नऊ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. आता याही प्रकरणी प्रश्न पडतो की, बेग्या पवार याचा गुन्हा नसतांना त्यास पोलिस कस्टडी देऊन मारहाण का करण्यात आली? तो पारधी समाजाचा होता म्हणून? की, खरा गुन्हेगार पोलिसांना गवसला नाही म्हणून? आणि जर बेग्या पवार गुन्हेगार होता. तर, मग न्यायालयाने पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा का ठोठावली? या घडामोडीत सुद्धा न्यायासाठी बेग्या पवार याच्या आई वडिलांना तब्बल १५ वर्षे वाट बघावी लागली. या पंधरा वर्षांत संबंधित पोलिसांनी कित्येक निरपराध्यांना गुन्हेगार ठरवले असतील. कित्येकांना पोलिस कोठडीत नाहक मारले असेल. त्यामुळे इतक्या वर्षांनी मिळालेल्या न्यायला न्याय म्हणावा की दिरंगाई, हा विचार न्यायप्रणालीने नक्कीच करायला हवा. तिकडे गुजरात मधील एका शिक्षकाला मृत्यूनंतर सतरा वर्षांनी सेवेत सामावून घेण्याचा गुजरात न्यायालयाने दिलेला आदेश देखिल अशाच दिरंगाईचे ज्वलंत उदाहरण म्हणायचे. अशा एक नव्हे कित्येक घटना आपल्या आसपास घडतात. जिथे अगदी आठ दहा दिवसांत किंवा महिन्यात काम व्हायला हवे. तिथे वर्षानुवर्षे लागून जातात. सरकारी काम आणि दहा महिने थांब, असे जे म्हटल्या जाते. ते काही खोटे नाही. मात्र, न्यायाच्या प्रतीक्षेत माणूस सरून जातो, त्याचे काय? कामगार न्यायालयात तर अशी कितीतरी प्रकरणे मिळतील. ज्यात न्यायाच्या प्रतिक्षेत कित्येक कामगारांनी जगाचा निरोप घेतलेला आहे. उत्तर प्रदेशातील १९७७ साली घडलेल्या एका हत्याकांडाच्या नुकताच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात हत्याकांडातील आरोपींची तब्बल ४९ वर्षानंतर निर्दोष मुक्तता करणे म्हणजे न्याय ठरेल काय? सर्वोच्च न्यायालयाने पाचही आरोपींची निर्दोष मुक्तता जरी केली असली तरी, यातील दोघांनी केव्हाच या जगताचा निरोप घेतलेला आहे. त्यामुळे या न्यायाला किती उशीर झाला हे सर्वांना समजून येते. जर या प्रकरणाचा निकाल लवकर लागला असता तर निर्दोष सिद्ध झालेल्यांना सुखाचे जीवन जगता आले असते. पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथील चिमुरडीवर बलात्कार आणि निर्घृण हत्या प्रकरणी जर जलदगती न्याय देऊन आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे यास फाशी ठोठावल्या जाऊ शकते तर इतरांच्या बाबतीत हा न्याय मिळायला उशीर का? या न्यायात दिरंगाई का? या दिरंगाईला जबाबदार कोण? पोलिस यंत्रणा की न्याय प्रणाली? कुठल्याही न्यायप्रणालीचा अपमान करण्याचा हेतू नाही. न्यायव्यवस्था आमच्यासाठी आदरणीय आहेत. मात्र, चोर सोडून संन्याशाला फाशी सारखे प्रकार जर वारंवार घडत असतील तर समाज सुधारणार नाही तर यातून अनेक गुन्हेगारांची निर्मिती होऊ लागेल. त्यातल्या त्यात फक्त न्याय प्रणालीतच नव्हे तर प्रत्येक शासकीय कार्यालयांत जनतेची कामे अशीच वेळ निघून गेल्यावर होत असतील तर, त्याचा फायदा कितपत होतो, याचाही विचार करणे गरजेचे आहे .

**- लीलाधर दवंडे**

# महान पार्श्वगायक मुकेश !



हिंदी चित्रपट सृष्टीतील महान पार्श्वगायक मुकेश यांची काल म्हणजे २२ जुलै रोजी जयंती होती. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती.

त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले. गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले.

या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले. अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली.

त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. महान पार्श्वगायक मुकेश याना जयंती निमित्त विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# कानडा राजा पंढरीचा !

महाराष्ट्रात धर्माला फार महत्त्व दिले जाते. धर्मतेज जागवणारा पंढरीचा विठोबा हा महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक राज्यांच्या सीमेवर आहे. काही जण म्हणतात, 'हा धनगरांचा देव आहे. हा मूळ 'आदिम' (आदिवासी), अ-नागर देवच पुढे धनगरांसह 'पंडरिगे' या गावी आला आणि पुढे तो 'पांडुरंग' झाला.' पंडरिगे या गावाची 'पंढरी' झाली. पूर्वी तेथे धनगरांच्या वस्त्या होत्या; परंतु नंतर नागरवस्तीमुळे पुढे या पंढरीला 'पंढरपूर' या नावाने संबोधण्यात येऊ लागले. अशा रितीने पंढरीचे पंढरपूर झाले.

पुंडलिकाच्या वेळी पंढरपूरला स्थापन झालेली पांडुरंगाची ही मूर्ती पुढे कर्नाटकातील विजयनगरच्या राजाने त्याच्या साम्राज्यात नेली. त्याने त्या मूर्तीची तुंगभद्रेच्या तिरावर स्थापना केली. त्या काळी महाराष्ट्रातील पैठण येथील संत भानुदास (संत एकनाथ महाराज यांचे आजोबा) हे विठ्ठलाचे मोठे भक्त होते. त्यांचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता. एकदा विठ्ठलाने प्रसन्न होऊन त्यांना दृष्टांत दिला आणि 'मी कर्नाटकात आहे. तू मला पंढरपुरात नेऊन माझी स्थापना कर', असे त्यांना सांगितले. विठ्ठलाने सांगितल्याप्रमाणे संत भानुदास यांनी विजयनगरच्या राजाकडे जाऊन विठ्ठलाच्या मूर्तीची मागणी केली. राजालाही दृष्टांत झाला होता. त्यामुळे संत भानुदासांचे विठ्ठल प्रेम आणि भक्ती पाहून राजाने ती मूर्ती त्यांना दिली. संत भानुदासांनी ती मूर्ती पंढरपूरला आणून तिची प्रतिष्ठापना केली.

पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला 'वीरभद्र' म्हणजेच 'विठ्ठल' म्हणतात, तर वैष्णव त्याला 'गोपाळकृष्ण' असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो 'हरिहर' आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण 'विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे', असेही म्हणतात. (आद्यशंकराचार्यांच्या काळात भारतात काही नवीन धार्मिक प्रवृत्तींचा उदय होऊन जैन, बौद्ध इत्यादी धर्मपंथ उदयास आले होते. महाराष्ट्रातही बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याचे दिसून येते; कारण कोकण किनारपट्टी, घाटमाथा, मराठवाडा येथील सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये बुद्धाच्या कलाकृती असलेल्या गुंफा दिसतात.) जैन विठ्ठलाला 'तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे', असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून 'विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा', असे जैनांचे मत आहे.

दक्षिणेला हाच गोपाल 'श्रीव्यंकटेश ऊर्फ तिरुपती बालाजी' म्हणून प्रसिद्ध आहे; कारण व्यंकटेशाची पत्नी पद्मावती आहे, तर विठ्ठलाच्या पत्नीचेही नाव पद्मावती (पदुबाई) आहे. व्यंकटेशाची पत्नी पद्मावती त्याच्यावर रूसून तिरूयानूर येथे चिंचेच्या वनात रहायला गेली, तर विठ्ठलाची पत्नी रुक्मिणी ही दिंडीर वनात (चिंचेच्या वनात) जाऊन बसली होती. 'विठ्ठलाला 'पांडुरंग' म्हणतात', तसेच व्यंकटेशालाही कर्नाटकातील पर्वताच्या स्थलनामावरून 'वेंगडम्' असे म्हणतात. त्यामुळेच त्याला 'विठ्ठलेश्वर अथवा व्यंकटेश' असेही म्हणतात. कुरूबा ('कुरूबा' समाज हा धनगर पोटजातीपैकी एक आहे.) आणि धनगर यांचा देव एकरूप होऊन त्यातून 'विठोबा'



निर्माण झाला. शिला प्रतिमेतून ही जी सांगोपांग मूर्ती घडली, ती मात्र या दोन्ही जमातींनी शतकानुशतके त्याच रूपात जपून ठेवली असली पाहिजे; म्हणूनच विठ्ठल आणि तिरुपति या दोन्ही मूर्तींत पुष्कळ साम्य आढळते. पंढरीचा विठोबा दोन्ही हात कटीवर ठेवून उभा आहे, तर कर्नाटकात तो एक हात कटीवर आणि दुसरा हात वरद मुद्रेत असलेला अशा स्वरूपात अनेक ठिकाणी पहायला मिळतो. त्यामुळेच संतांनी 'सावळा हो विठ्ठलु कर्नाटकु', असे त्याचे वर्णन केले आहे. संतांनी त्याला 'कानडा' म्हणूनही हाक मारली आहे. चैतन्याची ज्या अनुसंधानातून आराधना केली जाते, त्या स्वरूपात ते प्रगट होते. ज्याचा जसा भक्तीभाव असेल, तशी त्याला देव अनुभूती देतो. बंगालमधील कोलकाता येथील कोळ्यांच्या राणीने दक्षिणेश्वरीदेवीची स्थापना केली होती. त्या देवळात तिने श्रीरामकृष्ण परमहंस यांची पुजारी म्हणून नियुक्ती केली होती. श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या भक्ती-भावामुळे देवी त्यांच्यावर प्रसन्न झाली आणि तिने त्यांना दर्शन दिले. अनेकांना वाटते, 'दगडात देव असतो का ?'; परंतु 'भक्ती-भावाने दगडालाही पाझर फुटतो', हे ध्यानात घ्यायला हवे.

पांडुरंग हे सामान्यांचे दैवत आहे. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे. वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, ''अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच ! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते.'' संत ज्ञानदेव म्हणतात, 'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।' म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे. तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे. त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत. तो आत-बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो 'पांडुरंग' आहे. एकदा लहानपणी संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली, ''अरे दादा, तू या पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे.'' त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''मुक्ता, मी तुला गुरुमुखातून सांगतो. अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे.'' एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे. तो कष्टकरी, शेतकरी, सामान्यजन आणि अनाथ यांचा कैवारी आहे; म्हणून तो (उन्हात कष्ट करून रापलेला असा) काळ्या रंगाचा झाला आहे. असा हा सगुण-निर्गुण रूपी पांडुरंग आहे.

कोणत्या तरी विशिष्ट वारीला, तिथीला अथवा कोणत्या तरी मासात विशिष्ट देवतांची स्पंदने पृथ्वीवर अधिक प्रमाणात कार्यरत असतात. तो काळ त्या देवतेचा काळ मानला जातो, उदा. शिवाचा सोमवार, दत्ताचा गुरुवार, तशी श्रीविष्णूची एकादशी. वर्षभरात २४ वेळा येणार्या एकादशींच्या तुलनेत आषाढ आणि कार्तिक मासांतील शुक्लपक्षात येणार्या एकादशींच्या वेळी श्रीविष्णूचे तत्त्व पृथ्वीवर अधिक प्रमाणात येत असल्याने श्रीविष्णूशी संबंधित या दोन एकादशींचे महत्त्व अधिक आहे. (संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग)

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## वारीत रीत

नेता सामील वारीत
स्वार्थ न लपे मनात
त्याच्या सोयीकरता
उभारे मांडव कनात

व्हॅनिटी व्हॅन सोबत
व्यवस्था सर्व तैनात
अभंग किर्तनभजन
हरिपाठ घुमेकानात

निमित्ते कळले तया
काय चालले वनात
बळी राजा अस्वस्थ
वाळली रोपे रानात

महत्व जाणे घामाचे
चालता जरा उन्हात
लोकदेतातभरभरुन
महत्वअमुल्यदानात


जाणेसुखदुःख काय
फिरे सामान्य जनांत
मातीस्पर्शली पायाले
जो फिरतो विमानांत

खरा खजिना लपला
विठ्ठलभक्त निर्धनांत
हरिनाम ओठीरेंगाळे
मोद न मावी गगनात

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या बंगल्यावरील शाही खानपानाचा फेरविचार करावा

आखाती युद्धामुळे आपल्या देशाचे पंतप्रधान यांनी सर्व देशवासीयांना काटकसरीचे आवाहन केले असताना याउलट दुसरीकडे थेट महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांना शासकीय निवासस्थानी भेटायला येणाऱ्या अभ्यागतांचे, अतिथींचे आदरातिथ्य करण्यासाठीं मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वर्षा, उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या नंदवन तर सुनेत्रा पवार यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी शाही बडजास्त करण्यात आल्याचे वृत्त आहे. या खानपानाचा ठेका सुखसागर हॉस्पिटॅलिटी सर्विसेस यांना देण्यात आल्यासंदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. हा सर्व शाही खानपान सेवा खर्च सरकारच्या तिजोरीतून वार्षिक ९




कोटी ८५ लाख रुपयांतून केला जाणारं आहे. सीएम, डीसीएम यांना शासकीय बंगल्यावर भेटायला येणाऱ्यांना बटाटेवडा, पंजाबी समोसा, पट्टी समोसा, कचोरी कोथिंबीर वडी, मिसळ, पावभाजी, मटण बिर्याणी, चिकन बिर्याणी, ड्रायफ्रुट्स, मोदक, उकडीचे मोदक, काजू मोदक तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी शाही दावत डीनरची मेजवानी असा खास बेत असणारं आहे.

त्यामुळे पुढील चार वर्षांत सरकारी तिजोरीवर ३९ कोटी ४० लाख रुपयांचा बोजा पडणारं आहे. इकडे जनता महागाईने होरपळत असताना असा वारेमाप खर्च करणे योग्य आहे का ? अशी शाही बडजास्त करण्याची काही गरज वाटतं नाही कारण भेटायला येणारी सर्वसामान्य व्यक्तीचं असणारं आहेत शेवटी काय पंतप्रधानांनी काटकसरीचे आवाहन केले आहे. त्याला आपण अधिन राहिले पाहिजे त्यामुळे सरकारने या गोष्टीचा फेरविचार करणे गरजेचे आहे.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# किन्हवली पोलिसांची सर्जिकल स्ट्राईक खुनाचा गुन्हा उघड



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२२, शहापूर (ठाणे) :** किन्हवली पोलीस ठाणे हद्दीतील खुनाचा गुन्हा अवघ्या काही दिवसांत उघड करण्यात स्थानिक गुन्हे शाखा आणि किन्हवली पोलिसांना मोठे यश मिळाले असून आरोपीला जेरबंद करण्यात आले आहे.शहापूर तालुक्यातील खरपत नं.१ येथील रहिवासी वामन आलो निरगुडा (वय ५२) यांची अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने मानेवर वार करून निर्घृण हत्या केली होती. हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा असल्याने पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवली.

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत ठाणे पोलीस अधीक्षककडॉ.विनय कुमार राठोड आणि अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाला दिशा दिली. तसेच शहापूर विभागीय अधिकारी विशाल नागरगोजे, ठाणा गुन्हे शाखा निरीक्षक दादासाहेब एडके आणि किन्हवली पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक नितीन खैरनार यांनी विविध पथके तयार करून कसून तपास सुरू केला.मयत वामन निरगुडा हे घरापासून काही अंतरावर कामासाठी गेले होते. मात्र ते घरी परत न आल्याने त्यांची पत्नी ज्योती निरगुडा शोध घेण्यासाठी गेली असता, दुर्गम जंगलातील दरीत त्यांचा मृतदेह आढळून आला. परिसर अत्यंत दुर्गम असल्याने कोणतेही ठोस धागेदोरे मिळत नव्हते.अखेर पोलिसांच्या अथक प्रयत्नांना यश आले. संशयित धनेश देऊ मेंगाळ याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता धक्कादायक सत्य समोर आले. मयताच्या पत्नीशी आरोपीचे अनैतिक संबंध होते. या संबंधांमुळे अडथळा ठरत असल्याने आरोपीने वामन निरगुडा यांच्या मानेवर धारदार शस्त्राने वार करून त्यांची हत्या केल्याची कबुली दिली.या कारवाईमुळे किन्हवली पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मालमत्तेच्या हव्यासापोटी शिक्षिकेचा थरारक खून

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२२, कल्याण (ठाणे) :** कल्याण-डोंबिवली परिसराला हादरवून सोडणाऱ्या एका धक्कादायक प्रकरणाचा उलगडा ठाणे गुन्हे शाखा, घटक-३ ने केला आहे. अविवाहित शिक्षिका व एलआयसी एजंट संगीता मारुती चंदनशिवे (वय ५३, रा. मोहने-आंबिवली) यांची मालमत्ता बळकावण्यासाठी अमानुष मारहाण करून, मृत्युपत्र व मालमत्तेच्या कागदपत्रांवर जबरदस्तीने स्वाक्षरी घेतल्यानंतर नाक-तोंड दाबून हत्या करण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे. या प्रकरणी दिगंबर भागुजी आव्हाड आणि तुषार मुरलीधर रत्नपारखी या दोघांना गुन्हे शाखेने अटक केली असून पुढील कारवाईसाठी त्यांना नाशिक ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, वेणुबाई पावशे शाळेतील शिक्षिका व एलआयसी एजंट असलेल्या संगीता चंदनशिवे या १४ जुलै २०२६ रोजी एलआयसीच्या कामानिमित्त शहापूरला जात असल्याचे सांगून घराबाहेर पडल्या होत्या. त्या परत न आल्याने आणि मोबाईल बंद असल्याने त्यांचे भाऊ प्रवीण मारुती चंदनशिवे यांनी १५ जुलै २०२६ रोजी कोळशेवाडी पोलीस ठाण्यात मानव मिसिंग क्र. १३३/२०२६ दाखल केला.दरम्यान, १६ जुलै २०२६ रोजी नाशिक जिल्ह्यात एस.एम.बी.टी. मेडिकल कॉलेजसमोरील सिन्नर-घोटी मार्गालगत महिलेचा




मृतदेह आढळून आला. याप्रकरणी वाडीवहे पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे गुन्हा क्र. २१३/२०२६ अन्वये बीएनएस कलम १०३(१), २३८ व ३(५) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

समांतर तपासा दरम्यान सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेने दिगंबर भागुजी आव्हाड (वय ४८, व्यवसाय - ब्रोकर, रा. पॅन्टॅगॉन बिल्डिंग, ए विंग, रूम क्र. १११, आसनगाव) आणि तुषार मुरलीधर रत्नपारखी (वय ५२, व्यवसाय - चालक, रा. जीएन-०३, रूम क्र. ६२, एनआरसी कॉलनी, मोहने-आंबिवली) यांना ताब्यात घेतले.चौकशीत आरोपींनी धक्कादायक कबुली दिली. त्यांनी संतोष रमेश जाधव (रा. पेठ रोड, नाशिक) आणि विनोदचंद्र उर्फ संतोष पांडे (रा. मोहने-आंबिवली) यांच्या संगनमताने एलआयसी पॉलिसीच्या बहाण्याने संगीता चंदनशिवे यांना आसनगाव येथे बोलावले. त्यानंतर दिगंबर आव्हाडच्या भाड्याच्या घरात नेऊन त्यांच्या मालमत्तेच्या कागदपत्रांवर आणि मृत्युपत्रावर दिगंबर आव्हाड व तुषार रत्नपारखी यांना वारसदार म्हणून नमूद करून जबरदस्तीने स्वाक्षऱ्या घेतल्या. त्यानंतर अमानुष मारहाण करून त्यांचे नाक व तोंड दाबून हत्या करण्यात आली.

पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह कारमधून नाशिक रोडलगत टाकून आरोपी पसार झाले. या गुन्ह्याचा उलगडा पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, पोलीस सहआयुक्त (गुन्हे) पंजाबराव उगले, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध-१) शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे, पोलीस निरीक्षक महेश काळे, सपोनि गणेश दळवी, पोउनि किरण भिसे, सपोउपनि बालाजी शिंदे, सपोउपनि दत्ताराम भोसले, उल्हास खंदारे, सुधीर कदम, सचिन कदम, विलास कडू, अदिक जाधव, गोरखनाथ पोटे, विजय जिरे, प्रशांत वानखेडे, पांडुरंग भांगरे, सचिन भालेराव, प्रविण किनरे, गुरूनाथ जरग, सतिश सोनावणे, विनोद चन्ने, गोरक्ष शेकडे, गणेश हरणे, मिथुन राठोड, जालिंदर साळुंखे, मंगला गावीत आणि चालक सपोउपनि अमोल बोरकर यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# दिल्लीतील लाठीमाराच्या निषेधार्थ शहापूरकरांचा निषेध मोर्चा



**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.२२, शहापूर (ठाणे) :** वारंवार होणाऱ्या पेपरफुटी आणि एकूणच शिक्षण व्यवस्थेमुळे परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ होत आहे. याची गंभीर दखल घेत गेल्या जून महिन्यापासून दिल्लीतील जंतर मंतर येथे केजीपी च्या वतीने आंदोलन होत आहे. त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे देखील उपोषण चालू आहे. याला केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेद्र प्रधान हे जबाबदार आहेत आणि त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी होत आहे. मधल्या काळात जवळपास २० विद्यार्थ्यांनी आपले जिवन संपवले. मात्र याची दखल न घेता, उलट दिल्ली पोलिसांनी विद्यार्थ्यांचे आंदोलन चिरडुन टाकण्यासाठी अमानुष लाठीमार केला. अल्पवयीन मुलीवर तसेच लहान मुलांना देखील लाठीचा प्रसाद दिला याच्या तीव्र प्रतिक्रिया देशभरात उमटत आहे. शहापूरमध्ये देखील बुधवार, दिनांक २२ जुलै २०२६ रोजी निषेध मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चाची हाक शहापूर तालुका समाज बांधव तर्फे देण्यात आली. सकाळी ११ वाजता संत तुकाराम महाराज चौक (पंडित नाका) येथे भर पावसात शेकडो शहापूरकर एकत्र जमले. या मोर्च्यात मोठे - लहान मुले, मुली, वृद्ध नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. सुरवातीला आशिर्वाद चौकात जेष्ठ नेते काशिनाथ तिवरे यांनी सरकारच्या कार्यपद्धतीवर टीका केली, यानंतर हा मोर्चा मधला नाका येथे आल्यानंतर काही महिला व कार्यकर्त्यांनी मोर्चाला संबोधले आणि खालचा नाका मार्गे हा मोर्चा तहसीलदार कार्यालय येथे आला. तेथे अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यात लहान विद्यार्थी - विद्यार्थीनी देखील सरकारच्या कारवाईचा निषेध केला. यावेळी देशभक्तीपर घोषणांबरोबर पोलिसांच्या लाठीमाराचा निषेध करणाऱ्या घोषणा देण्यात आला. त्याचबरोबर मंत्री धर्मेद्र प्रधान यांचा राजीनामा दिला पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. तहसीलदार परमेश्वर कासुळे यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले. यावेळी आपले निवेदन मिळाले असून ते शासनापर्यंत पोहचविण्याचे आश्वासन दिले. यानंतर आयोजकांकडुन शहापूरकरांनी भरपावसात दिलेल्या प्रतिसादाबद्दल आभार मानण्यात आले आणि राष्ट्रगान झाल्यानंतर मोर्चाची सांगता झाली. यावेळी पक्षभेद विसरुन मोठ्या प्रमाणावर शहापूर तालुक्यातील नागरिक मोर्चात सहभागी झाले होते.

# रक्तदान, वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियानातून स्व.अजितदादा पवारांना मानवंदना

## रक्तदान शिबिरात १६७ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग




**रक्तदानातून मानवतेची सेवा, वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छता अभियानातून सामाजिक जबाबदारीची जाणीव या तिन्ही मूल्यांचा प्रभावी संगम या उपक्रमांतून अनुभवायला मिळाला. स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती सप्ताहाला औपचारिकतेपलीकडे जाऊन लोकहिताचे स्वरूप प्राप्त करून देणाऱ्या या उपक्रमांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, पारनेर तालुक्यात हा जयंती सप्ताह समाजसेवा, पर्यावरण संरक्षण आणि लोकसहभागाचा प्रेरणादायी आदर्श ठरला.**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती सप्ताहानिमित्त पारनेर तालुक्यात समाजोपयोगी उपक्रमांची प्रेरणादायी मालिका राबविण्यात आली. सेवा, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धन या त्रिसूत्रीवर आधारित भव्य रक्तदान शिबिर, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन तसेच स्वच्छता अभियान अशा विविध उपक्रमांद्वारे स्व. अजितदादा पवार यांच्या सेवाभावी विचारांना अभिवादन करण्यात आले. या सर्व उपक्रमांना नागरिक, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

आमदार काशिनाथ दाते जनसंपर्क कार्यालय, पारनेर येथे जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी ब्लड सेंटर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात १६७ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी आमदार काशिनाथ दाते यांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करत, समाजहितासाठी राबविण्यात येणारे असे उपक्रम म्हणजे स्व. अजितदादा पवार यांच्या सेवाभावी विचारांना वाहिलेली खरी आदरांजली असल्याचे सांगितले.

जयंती सप्ताहानिमित्त शृंग ऋषी गड, भाळवणी येथे वृक्ष संवर्धन व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. मान्यवरांच्या हस्ते विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पुढील पिढीसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. तसेच पारनेर शहरातील वरची वेस परिसरातही वृक्षलागवड करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.

याच दिवशी पारनेर शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (पंचायत समिती), महात्मा ज्योतिबा फुले पुतळा (पारनेर वेस), सेनापती बापट स्मारक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (बाजारतळ) या परिसरात स्वच्छता करून सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ, सुंदर आणि प्रेरणादायी ठेवण्याचा संदेश देण्यात आला.

समाजहिताचे कार्य प्रत्यक्ष कृतीतून साकार करण्याचा संकल्प या अभियानातून व्यक्त करण्यात आला. या सर्व उपक्रमांप्रसंगी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांतदादा गायकवाड, जिल्हा परिषद माजी सदस्य वसंतराव (वसंत) चेडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उपजिल्हाध्यक्ष आर. एस. कापसे, उद्योजक दिलीप दाते, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, युवती तालुकाध्यक्षा अपर्णा खामकर, युवक तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, डॉ. प्रदीप दाते, पारनेर शहराध्यक्ष राजू औटी, उपशहराध्यक्ष सुनिल गाडगे, नगरसेवक अशोक चेडे, नगरसेवक युवराज पठारे, देवरामशेठ मगर, पंढरीनाथ उंडे, मंगेश दाते यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि तालुक्यातील विविध गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छावा प्रतिष्ठानच्या बालगोपाळांची दहीहंडीची जय्यत तयारी सुरू

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२२, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल तालुक्यातील उसर्ली खुर्द येथील युवा तरुणांनी स्थापन केलेल्या छावा प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेमार्फत विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येत आहे. गेल्या दोन वर्षांपासून प्रतिष्ठानच्या माध्यमातून महापुरुषांच्या जयंती उत्सवांचे आयोजन, विविध सण-उत्सव साजरे करणे तसेच सामाजिक बांधिलकी जपत अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. छावा प्रतिष्ठानमधील युवक प्रत्येक सण आणि सामाजिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करत असतात. यंदाच्या श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रतिष्ठानच्या बालगोपालांनी दहीहंडीची जय्यत तयारी सुरू केली आहे. दररोज नियमित सराव, मानवी मनोरे उभारण्याचे प्रशिक्षण तसेच सुरक्षिततेची विशेष काळजी घेत बालगोपाल दहीहंडी उत्सवासाठी सज्ज होत आहेत. या सरावामध्ये लहान मुलांपासून युवकांपर्यंत सर्वजण उत्साहाने सहभागी होत असून परिसरात सणाचे वातावरण निर्माण झाले आहे. छावा प्रतिष्ठानच्या माध्यमातून युवकांमध्ये संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण आणि सामाजिक एकात्मता वाढीस लागावी हा प्रमुख उद्देश असून, दहीहंडीच्या तयारीतूनही हेच संस्कार युवकांवर रुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे. यंदाही छावा प्रतिष्ठानतर्फे दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे पालन करून साजरा करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

# रांजणीत पंचायत समितीचा जनता दरबार

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२२, धाराशिव :** कळंब तालुक्यातील रांजणी येथे पंचायत समितीचा जनता दरबार घेण्यात आला. सर्वप्रथम दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला हार घालून. जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीच्या सभापती प्राचार्य राजश्री वरपे होत्या. यांच्या अध्यक्षतेखाली विविध विकास कामे व तक्रारी या जनता दरबारामध्ये घेण्यात आल्या यामध्ये अंगणवाडी च्या समस्या, शाळेच्या समस्या, उप आरोग्य केंद्र, शेत रस्ते, महावितरण कंपनी च्या तक्रारी, विविध विषयावर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आली. यामध्ये विविध खात्याचे अधिकारी उपस्थित होते यामध्ये समाज कल्याण विभाग सभापती जिल्हा परिषद विश्वासराव कोकणे, पंचायत समिती उपसभापती प्रणिता चव्हाण, जिल्हा परिषद सदस्य राजाभाऊ शितोळे, पंचायत समिती सदस्य योगेश्वरी पवार, सहाय्यक गटविकास अधिकारी पंचायत समिती मनीषा सुकाळे, विस्तार अधिकारी पस कळंब साळुंखे साहेब, आरोग्य अधिकारी, कृषी सहाय्यक, महावितरण अधिकारी उपस्थित होते. आपलं पंचायत समिती ७ गावचा पंचायत समितीचे अधिकारी सभापती उपसभापती गटविकास अधिकारी आरोग्य विभाग जिल्हा परिषद पंचायत समितीचे विविध विभागाचे खाते प्रमुख उपस्थित होते.

# शिशुविहार प्राथमिक विद्यालय, आकुर्डी विद्यालयात अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, पुणे :** अजितदादांनी आपल्या हयातीत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष असताना बहुजन हिताय बहुजन सुखाय या ब्रीदवाक्याप्रमाणे संस्थेतील अनेक गरजू विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे. यासाठी सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा तयार करून दिल्या आणि याचीच आठवण म्हणून आताच्या विद्यार्थ्यांना दादांविषयी सर्व प्रकारची माहिती असणे गरजेचे आहे हर मुख्याध्यापिका योगिता काळे यांचा दृष्टिकोन व संस्थेचा दृष्टिकोन याला अनुसरून इयत्ता -प्लेवर्ग ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यालयात दि.१९ जुलै ते २२ जुलै पर्यंत चित्रकला, रांगोळी, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धांमध्ये सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते, वक्तृत्व स्पर्धेतून अजितदादांविषयी जीवनपट काही विद्यार्थ्यांनी उलगडून दाखवला. तसेच अजितदादांच्या जयंतीदिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक प्रमोद प्रभाकर कुटे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून व दादांना अभिप्रेत असलेली पर्यावरणविषयीची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी म्हणून प्लास्टिक संकलन करून ते महानगरपालिकेला सुपूर्द करणे हे दोन विशेष उपक्रम विद्यालयात घेण्यात आले.

नगरसेवक प्रमोद कुटे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण, दादांची शिस्त, वक्ताशीरपणा तसेच वेळेचे नियोजन या गोष्टी आपण अजितदादांकडून घ्याव्यात असे मत आपल्या मार्गदर्शन भाषणात व्यक्त केले.अशा प्रकारे शिशुविहार प्राथमिक विद्यालयात अजितदादा पवार यांची जयंती विविध उपक्रम आयोजित करून साजरी करण्यात आली. या सर्व कार्यक्रमासाठी विदयालयातील सर्व शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले.

# मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल येथे भव्य रक्तदान शिबिर संपन्न



**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२२, पनवेल (नवी मुंबई) :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल तालुक्यातील पळस्पे येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन जिल्हा परिषद सदस्या हर्षदा अतुल घरत यांनी केले.

पावसाळी वातावरण असूनही नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान शिबिरात सहभाग नोंदविला. या शिबिरामध्ये एकूण१५० रक्तदात्यांनी रक्तदानकरून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. रक्तसंकलनाची संपूर्ण प्रक्रियाअपोलो हॉस्पिटल ब्लड सेंटरयेथील डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास प्रमाणपत्र तसेच भेटवस्तू म्हणूनइलेक्ट्रिक कॅटलप्रदान करण्यात आली.सध्या विविध रुग्णालयांमध्ये रक्तसाठ्याची कमतरता जाणवत असल्याने रक्तदानाचे महत्त्व अधिक वाढले आहे. रक्ताची गरज आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी लक्षात घेऊन तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा स्वरूप ही अनोखी भेट देण्याच्या उद्देशाने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप रायगड जिल्हाध्यक्ष मंगेश वाकडीकर, उसर्ली खुर्दचे माजी सरपंच अतुल तांबे, स्थानिक पोलीस सेच स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे अभिनंदन करत रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमांमध्ये नागरिकांनी अधिकाधिक सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

# राज्य कबड्डी संघटनेतर्फे खेळाडू आयोग स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू

## राज्यातील माजी आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडूंना आवहान

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.२२, मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने खेळाडू आयोग स्थापनेच्या प्रक्रियेला सुरूवात झाली आहे.असोसिएशनच्या प्रशासनात खेळाडूचे प्रभावी व अर्थपूर्ण प्रतिनिधित्व सुनिश्चित करणे, खेळाडू कल्याणाला प्राधान्य देणे. तसेच पारदर्शकता उत्तरदायित्व, प्रामाणिकता आणि सुशासनाची तत्त्वे अधिक बळकट करणे हा या खेळाडू आयोगाचा मुख्य उद्देश आहे.

या आयोगाची स्थापना झाल्यानंतर असोसिएशनच्या प्रशासनामध्ये खेळाडूंना स्वतः चे हित अधिकार व कल्याण यांचे प्रभावी प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. खेळ प्रशासनामध्ये खेळाडूचा सक्रिय सहभाग वाढविणे व देशातील क्रीडा क्षेत्राचा दर्जा वाढवणे हा राष्ट्रीय क्रीडा अधिनियम २०२५ चा मुख्य उद्देश आहे. अच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाचे मार्गदर्शक तत्वे व राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम २०२५ मधील तरतुदी प्रमाणे महाराष्ट्र राज्य कबडी असोसिएशनच्या अंतर्गत क्रीडा आयोगाची स्थापना करण्यात येणार आहे. राज्यातील ज्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केलेले आहे. मेजर ध्यानचंद खेलरत्न, अर्जुन पुरस्कार प्राप्त किंवा राष्ट्रीय स्पर्धेतील पदक प्राप्त खेळाडूना या क्रीडा आयोगात सहभागी होण्याची संधी प्राप्त होणार आहे.

सदरील खेळाडू हा किमान एक वर्ष अगोदर खेळातून निवृत्त झालेला असावा व खेळाडूचे वय २५ वर्षा पेक्षा जास्त व ७० वर्षापेक्षा कमी असावे. ही अट अनिवार्य आहे.महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनला संलग्न असणाऱ्या जिल्ह्यातील पात्र व इच्छुक माजी आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी १० ऑगस्ट २०२६ पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज भरून राज्य संघटनेच्या अधिकृत ईमेलवर अपलोड करून, संघटनेचे मध्यवर्ती कार्यालय शिवाजी पार्क दादर मुंबई येथे दाखल करावेत. प्राप्त अर्जाची छाननी करून, पात्र खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. यामध्ये पुरुष व महिला यांना समान संधी राहील.

पात्र ठरलेले खेळाडू महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अधिकृत सभासद होतील व त्यांना या सभेचे सर्व अधिकार प्राप्त होतील. या योजनेचा राज्यातील जास्तीत जास्त अतिउच्च कामगिरी करणाऱ्या माजी आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी सहभाग घेऊन असोसिएशनचे प्रशासन अधिक बळकट करण्यासाठी सहकार्य करावे. असे आवहान राज्य कबड्डी संघटनेचे प्रभारी अध्यक्ष गजानन कीर्तिकर व प्रभारी सरकार्यवाह माधव गायकवाड यांच्या वतीने करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी संघटनेच्या संकेत स्थळाला खेळाडूंनी भेट द्यावी असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त कोंढा येथे भाजपतर्फे रक्तदान शिबिर संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, भद्रावती (चंद्रपूर) :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त घोडपेठ–माजरी मंडळ भारतीय जनता पक्षाच्या वतीने कोंढा येथील तुकडोजी भवन परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराला परिसरातील युवक व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. शिबिराचे उद्घाटन घोडपेठ–माजरी मंडळ अध्यक्ष शामसुंदर उरकुडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे माजी अध्यक्ष हंसराज अहीर, वरोरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार करण देवतळे, विधानसभा संघटक किशोर बावणे, माजी जिल्हा परिषद सदस्य विजय वानखेडे, प्रशांत डाखरे, उमेश बोढेकर, किसन सूर, सुरज चौधरी, केशव लांजेवार, बालू बोकारे, देवा शंकावार, वैशाली उरकुडे माजी सरपंच घोडपेठ यांनी शिबिरास भेट देऊन आयोजक व रक्तदात्यांचे कौतुक केले.

या रक्तदान शिबिरात एकूण ६१ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. उपस्थित मान्यवरांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत अशा सामाजिक उपक्रमांमध्ये युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी घोडपेठ–मजरी मंडळातील पदाधिकाऱ्यांसह कोंढा गावातील सहसंयोजक अक्षय नागपुरे, मंगेश देवगडे, संजय



राजूरकर, शिवशंकर मडावी, पांडुरंग निब्रड, विनोद नागपुरे, संदीप काल्लर, साजन काळे, अनुज नागपुरे, अनुप थेरे, पवन साखरकर, खुशाल गोंडे, अजय काळे, कौशल मत्ते, राहुल निब्रड तसेच गावकरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त चारठाणा येथे महाआरोग्य व रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.२२, चारठाणा (परभणी) :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी, चारठाणा मंडळाच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र, चारठाणा येथे महाआरोग्य तपासणी, रक्तदान शिबिर व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

महाआरोग्य तपासणी शिबिरात सुमारे ८५० रुग्णांची तपासणी करण्यात आली, तर १५० गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. रक्तदान शिबिरात ८२ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपणही करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा तालुकाध्यक्ष गोविंद थिटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महामंत्री डॉ. पंडित दराडे, जि.प. अध्यक्ष विजयकुमार वाकळे, माजी जि.प. सभापती मीनाताई राऊत, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सारिका पारवे, भाजपा नेते नानासाहेब राऊत, पंचायत समिती सभापती किशोर खिस्ते, जि.प. सदस्य भगवान वटाणे, रोहित चव्हाण, पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख, भगवान जगताप, राजुभाऊ घुगे, संतोष ढोणे, परमेश्वर ढाकरे, रामराव घुगे, दत्तराव नवले, संदीप घुगे, सुमेध सूर्यवंशी, प्रतीक



खिल्लारे, डॉ. राजेश पोकरणा, सरपंच अनिरुद्ध चव्हाण, उपसरपंच वाजेद कुरेशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात हृदयरोग, अस्थिरोग, त्वचारोग, नेत्ररोग व दंतरोग तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली. हुजूर साहेब ब्लड बँकेचे संचालक दत्ता नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तसंकलन करण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख, साबेर पठाण, मंथय्या स्वामी, सनिम देशमुख, वैजनाथ मुंजे, इसाकोद्दीन काझी, अमोल भवरे, विशाल निकाळजे, दिपक भाग्यवंत, गणेश राऊत, सय्यद अर्शद, विलास मुजमुले तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. सामाजिक बांधिलकी, आरोग्य जनजागृती आणि रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमाचे नागरिकांकडून सर्वत्र कौतुक करण्यात आले.

## साई आश्रय सेवा मंडळाचा भव्य पदयात्रा व पालखी सोहळ्यास प्रारंभ

**अक्षराज : सुनिल साखरकर**



**दि.२१, टिटवाळा (ठाणे) :** गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे, या ही वर्षी दिनांक २१ जुलै २०२६ रोजी टिटवाळा, मांडा येथून साई आश्रय सेवा मंडळाची पदयात्रा व पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले हे वर्ष मंडळाचे रौप्य महोत्सवी वर्ष असून मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीर, गरीब व गरजू शालेय विध्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप तसेच जेष्ठ नागरिकांना छत्री वाटप असे विविध कार्यक्रम राबवण्यात आले. पालखीच्या ह्या रौप्य महोत्सवी वर्षांपासून मंडळाने श्री क्षेत्र शिर्डी येते प्रस्थान करताना आपल्या पालखीचे कोठेही नाव व्हावे. यासाठी प्रत्येक गावागावातून जाताना स्वच्छता अभियान व नशामुक्त पालखी सोहळा साजरा करण्याचे ठरवले आहे. या पालखीची रूपरेषा पहाटे ६ वाजल्यापासून सुरु झाली, प्रस्थान सोहळ्यास साईलीला मंडळ, लालबाग, यांचे मांजरेकर गुरुजी, बाळू पाटील, रवींद्र पाटील व सुनिल साखरकर या कार्यकारिणीची उपस्थिती होती. सांगता समारंभ पालखीची पूजा व महाप्रसाद (भंडारा) शनिवार, दि.०१ ऑगस्ट २०२६ रोजी पालखी प्रस्थान केलेल्या ठिकाणाहून म्हणजेच गावदेवी मंदिर, मांडा, टिटवाळा (प.) येथे होणार आहे. त्यासाठी या संपूर्ण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे मंडळाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

## बोरी येथे अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त ५०० लाभार्थ्यांना विमा संरक्षण

**अक्षराज : जफर शेख**

**दि.२२, बोरी (परभणी) :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री सन्माननीय अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अजय चौधरी, यांच्या वतीने एका अत्यंत स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत बोरी येथील तब्बल ५०० गरजू लाभार्थ्यांना प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत जीवन विमा संरक्षण प्रदान करण्यात आले आहे. या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य बाबर खान, करुण नागरे तसेच अनेक नागरिक उपस्थित होते. केवळ औपचारिक साजरा न करता नागरिकांच्या भविष्याची आणि कुटुंबाची सुरक्षा लक्षात घेऊन राबवलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या विमा संरक्षणामुळे ५०० कुटुंबांना मोठा आर्थिक आधार आणि सुरक्षिततेचे कवच मिळाले आहे. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त घेतलेल्या या सामाजिक निर्णयामुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अजय चौधरी यांच्या उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे मनापासून आभार मानले आहेत.

## शिरपूर येथे महाराजस्व समाधान शिबीर अभियानात विविध योजनांचे वाटप

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.र२२, शिरपूर (धुळे) :** शिरपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जन्मदिवस व माजी उपमुख्यमंत्री अजीत पवार यांच्या जयंती निमित्त शिरपूर येथे २२ जुलै रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबीराचे आयोजन तहसील कार्यालय शिरपूर अंतर्गत करण्यात आले होते.

सदर शिबीर राजगोपाल भंडारी हॉल मध्ये घेण्यात आले. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या उद्देशाने शिरपूर येथील राजगोपाल भंडारी सभागृह शिरपूर येथे माजी शालेय शिक्षणमंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ रोजी भव्य 'समाधान शिबीर' चे आयोजन करण्यात आले होते. या समाधान शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना शासनाच्या महसूल, कृषी, बांधकाम, पशुसंवर्धन, आरोग्य,शिक्षण, महावितरण, परिवहन मंडळ, नगरपरिषद, आदिवासी विकास, महिला व बालकल्याण अश्या विविध विभागांचा योजनांचा थेट लाभ मिळवून देणे आणि त्यांच्या अडचणी तातडीने सोडवणे हा मुख्य उद्देश होता.आमदार अमरिशभाई यांनी आपले शासन सामान्य नागरिकांच्या विकासासाठी नियमित तत्पर आहे कोणीही पात्र लाभार्थी कोणत्याही शासकीय योजनांपासून वंचीत राहू नये यासाठी या समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे त्यांचा लाभ घेऊन आपल्या कुटुंबाच्या विकासाला मदत होईल असे आवाहन आपल्या अध्यक्षीय भाषणात केले. आमदार काशीराम पावरा यांनी ग्रामीण आदिवासी विकास करण्यासाठी शासकीय योजनांचे महत्व व उपयोग यांचे मार्गदर्शन केले.

अभियानांतर्गत दिल्या गेलेल्या प्रमुख सेवा व लाभ हे महसूल विभाग, ग्राम विकास विभाग,नगर विकास विभाग,आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग, एम एसईबी, कृषी विभाग, शिक्षण विभाग या सर्व विभागाच्या विविध योजनांचा लाभ शिरपूर तालुक्यातील लाभार्थींना दिला गेला.शिबिराला आ.अमरिशभाई पटेल, आ. काशीराम पावरा, आरसी पटेल संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी,प्रांताधिकारी शरद मंडलिक, तहसीलदार महेंद्र माळी, नगरपालिकेचे सीईओ प्रशांत सरोदे, बबन चौधरी, शिवसेनेचे तालुका अध्यक्ष हेमंत पाटील आदी उपस्थित होते. शिबिराला विविध विभागाचे स्टॉल लावण्यात आलेले होते. यावेळी नागरिकांच्या समस्या तेथेच सोडविण्यात आल्या त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये आनंद निर्माण झाला होता.

# थोडक्यात बातम्या

## पाटण येथे कातकरी समाजातील महिलांना शासनामार्फत साडी वाटप

**अक्षराज : सुरेश संकपाळ**



**दि.२२, पाटण (सातारा) :** पाटण तालुक्यातील अंत्योदय रेशन कार्ड धारक महिलांसाठी शासनाच्या वतीने मोफत साडी वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. पाटण तालुक्यातील एकूण ३००२ अंत्योदय कार्ड धारक कष्टकरी महिलांना प्रत्येकी एक याप्रमाणे साडी देण्यात येणार असून, कातकरी वस्तीमध्ये जाऊन प्रत्यक्ष लाभार्थ्यांना साडी वाटप करण्यात आले. हा उपक्रम गरजू व कष्टकरी महिलांसाठी शासनाचा दिलासादायक उपक्रम असून, महिलांच्या सन्मानासाठी राबविण्यात आला आहे. कष्टकरी गरजू लोकांना शासनाची मदत मिळावी, या उद्देशाने पुरवठा विभाग व महाराजस्व अभियान अंतर्गत हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या वाटप कार्यक्रम प्रसंगी प्रांताधिकारी सोपान टोम्पे व तहसीलदार अनंत गुरव यांच्या हस्ते लाभार्थी महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.


यावेळी प्रांताधिकारी सोपान टोम्पे म्हणाले, शासन नेहमीच गोरगरीब, कष्टकरी महिलांच्या पाठीशी उभे आहे. अंत्योदय धारक महिलांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. तहसीलदार अनंत गुरव यांनी सांगितले की, पाटण तालुक्यातील सर्व ३००२ पात्र लाभार्थ्यांपर्यंत लवकरच साडी पोहोचविण्यात येणार आहे. कोणत्याही महिलेस वाटपापासून वंचित ठेवले जाणार नाही. कार्यक्रमाला महसूल विभागाचे कर्मचारी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका उपस्थित होते. लाभार्थी महिलांनी शासनाच्या या योजनेबद्दल समाधान व्यक्त केले.

## कडेगाव तालुका कृषी पीक स्पर्धेत अभिजीत यादव यांचा प्रथम क्रमांक

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.२२, उंब्रज (सातारा) :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत समृद्ध शेतकरी – समृद्ध भारत अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कडेगाव तालुका कृषी पीक स्पर्धेत कडेपूर येथील प्रगतशील शेतकरी अभिजीत प्रल्हाद यादव यांनी सोयाबीन पिकाचे विक्रमी उत्पादन घेत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. आधुनिक शेती तंत्रज्ञानासोबत जैविक खतांचा प्रभावी वापर करून कमी क्षेत्रात अधिक उत्पादन घेण्याचा आदर्श त्यांनी निर्माण केला. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. अभिजीत प्रल्हाद यादव हे जुन्या काळातील नामांकित मल्ल कै.साहेबराव यादव वस्ताद यांचे नातू असून, त्यांनी शेती क्षेत्रातही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या यशामुळे कडेपूर गावासह संपूर्ण कडेगाव तालुक्याचा गौरव वाढला आहे.सत्कार समारंभास कृषी विभागाचे अधिकारी, पंचायत समितीचे पदाधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अभिजीत यादव यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कृषी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. प्रगतशील शेती, आधुनिक तंत्रज्ञान आणि जिद्दीच्या मिळवलेले हे यश इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे, अशा भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या.




## दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ आज दिवा शहर बंदचे आवाहन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, दिवा (ठाणे) :** दिल्लीतील जंतर – मंतर येथे शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ दिवा शहरातील सर्व व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांना २४ जुलै २०२६ रोजी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दिवा मर्चंट सेवा संस्था व्यापारी संघटनेच्या वतीने हे आवाहन करण्यात आले आहे. संघटनेच्या अध्यक्षा सौ. ज्योती राजकांत पाटील यांनी सांगितले की, लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकाला आणि विद्यार्थ्यांना शांततापूर्ण आंदोलन करण्याचा घटनात्मक अधिकार आहे. विद्यार्थ्यांवर झालेल्या बलप्रयोगाचा आम्ही जाहीर निषेध व्यक्त करतो. आपल्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना बळ मिळेल. म्हणूनच दि.२३ जुलै रोजी दिवा शहरातील सर्व दुकानदारांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवून विद्यार्थ्यांना पाठिंबा द्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे. या बंदमध्ये राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सर्वसामान्य नागरिकांनी ही सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## कलगी तुऱ्याचा जनक काळाच्या पडद्याआड; शाहीर रामचंद्र घाणेकर यांचे दुःखद निधन

**अक्षराज : उदय दणदणे**



**दि.२२, रायगड :** कलगी तुरा लोककलेचे जनक आणि रायगड भूषण पुरस्काराने सन्मानित स्व. शाहीर रामचंद्र हरी घाणेकर यांचे दिनांक २१ जुलै २०२६ रोजी पढवण, ता.तळा, जि.रायगड येथे वयाच्या ६९ व्या वर्षी दुःखद निधन झाले. गेली ६ वर्षे ते अर्धांगवायू या दीर्घ आजाराशी झुंज देत होते. गेल्या दोन–तीन वर्षांपासून त्यांच्यावर मुंबईतील रुग्णालयात तसेच ग्रामीण ठिकाणी उपचार सुरू होते. गेले दोन महिने त्यांची प्रकृती चिंताजनक होती. अखेर दीर्घ आजाराशी झुंज देत त्यांनी पढवण येथील राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने अवघ्या कोकण कला विश्वात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या जाण्याने कोकण साहित्य व कलाक्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. दिनांक २१ जुलै रोजी दुपारी ३ वाजता, पढवण येथील स्मशानभूमीत जड अंतःकरणाने त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्ययात्रेस सामाजिक, कला, राजकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच शाहीर वर्ग उपस्थित होता. कलगी तुरा समाज उन्नती मंडळ, शिष्य मंडळी तसेच राजकीय विविध सामाजिक संस्थाच्या वतीने स्व.शाहीर रामचंद्र घाणेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली जात आहे.